
■ दैनिक ■ छत्रपती संभाजीनगर ■ वर्ष-२ ■ अंक-३०० ■ शुक्रवार, दि. २१ फेब्रुवारी २०२५ ■ पाने ४ ■ किंमत २ रूपये
■ Daily ■ Chhatrapati sambhajinagar ■ Vol.2 ■ Issue -300 ■ Friday, 21 Feb 2025 ■ Pages-4 ■ Price- 2/-
Email : attalsanket2023@gmail.com
RNI No. MAHMAR/2023/87816

दैनिक
# अट्टल संकेत
ATTAL SANKET



# प्रकटदिनानिमित्त लाखो भाविकांनी घेतले श्रींचे दर्शन

**दिनेश परदेशी/छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत विशेष प्रतिनिधी)**

'गण गण गणात बोते' असे नामस्मरण करत संतश्रेष्ठ श्री गजानन महाराजांच्या दर्शनाची ओढ घेऊन सुमारे दीड लाख भाविकांनी गारखेडा येथील संत गजानन महाराज मंदिरात श्रींचे दर्शन घेतले. 'श्री गजानन.. जय गजानन' असा जप करत प्रकटदिनी गजानन माऊलींचे दर्शन घेतल्याने समाधान झाल्याचे भाविक भक्तांच्या चेहऱ्यावर दिसले. प्रकटदिन आणि गुरुवार एकाच दिवशी आल्याने गारखेडा येथील संत गजानन महाराज मंदिरात सकाळपासूनच भाविकांच्या दर्शनासाठी रांगा लागल्या होत्या.

गजानन महाराज प्रकटदिनानिमित्त गारखेडा येथील मंदिरात गुरुवारपासून ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा, भागवत कथा, कीर्तन आदी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. आज गुरुवारी प्रकटदिनी पहाटे चार वाजता ब्रह्मवृंदाच्या मंत्रोच्चारात व विश्वस्त मंडळाच्या उपस्थितीत श्री गजानन महाराज, विठ्ठल रखुम ईच्या मूर्तींचे अमृताभिषेक पूजन करण्यात आले. सकाळी ११ वाजता गणेश यागाची पूर्णाहुती झाली. त्यानंतर सायंकाळी पाच वाजेपर्यंत महा प्रसादाचे वाटप झाले.

कडा कार्यालयाच्या प्रवेशद्वारापासून मंदिरापर्यंत दर्शनबारी तयार करण्यात आली होती. दर्शनबारीत चार रांगा लागतील अशी व्यवस्था करण्यात आली होती. शिवाय पिण्याच्या पाण्याची, प्रथमोपचाराची, हिरकणी कक्षाची सोय करण्यात आली होती. भक्तांना दर्शनबारीत सरबत देण्यात आले. प्रकटदिनी दिवसभरात सुमारे तीन लाख भाविकांनी गजानन महाराजांचे दर्शन घेतल्याचे विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष डॉ. प्रवीण वक्ते यांनी सांगितले. दर्शनार्थींच्या रांगेत प्रत्येक ठिकाणी भक्तांकडून शिस्तीचे पालन करण्यात आले.

पाचशे ते सहाशे सेवेकरी

प्रकटदिनी मंदिरामध्ये दर्शनबारी, गाभाऱ्याम ध्ये प्रसादवाटप, चप्पल स्टैंड आदी ठिकाणी ६०० सेवेकऱ्यांनी सेवा दिली.

दर्शन बारीमध्ये थांबलेल्या भाविकांच्या सेवेसाठी दिवसभर सतत हातात पाण्यांनी भरलेले ग्लास घेतलेले सेवेकरी सेवा देत होते, असे विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष डॉ. प्रवीण वक्ते यांनी दै. 'अट्टल संकेत'शी बोलताना सांगितले.

## बनावट नोटा छपाई प्रकरणी संगमनेरमध्ये छापा, एका व्यक्ती विरोधात गुन्हा दाखल

**संगमनेर :** संगमनेर शहराच्या हद्दीला खेटून असलेल्या गुंजाळवाडी गावातील एका घरात बनावट नोटा छापल्या जात असल्याच्या संशयावरून पोलिसांनी आज तेथे छापा टाकला. यामध्ये काही प्रिंटर, कागद बनावट, बनावट नोटा ताब्यात घेण्यात आल्या आहेत. याप्रकरणी पोलिसांनी एका व्यक्ती विरोधात गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणी ताब्यात घेतलेल्या आरोपीचे नाव रजनीकांत प्रमोद राहणे ( राहणे मळा, गुंजाळवाडी, संगमनेर) असे आहे. याबाबत मिळालेली माहिती अशी की दिल्ली येथील गुप्तचर विभागाला संगमनेरात बनावट नोटा छापल्या जात असल्याची माहिती मिळाली होती. त्यांनी पुणे गुप्तचर विभागाकडे संबंधित माहिती देत कारवाईचे निर्देश दिले होते. त्यानुसार पुणे येथील गुप्तचर विभागाच्या अधिकाऱ्यांनी संगमनेरच्या उपविभागीय पोलीस अधिकारी यांना माहिती देत कारवाई करण्याचे आदेश दिले. त्यानुसार संगमनेर पोलीस पथकाने संबंधित घरावर आज दुपारी छापा टाकला. पोलीस उपाधीक्षक डॉ. कुणाल सोनवणे, संगमनेर शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख, उपनिरीक्षक समीर अभंग, पोलीस कर्मचारी हरिश्चंद्र बांडे, राहुल डोके, राहुल सारबंदे यांचा कारवाई करण्यासाठी गेलेल्या पथकात समावेश होता. घराची झडती घेतली असता काही प्रिंटर, नोटा तयार करण्यासाठीचे कागद आणि काही बनावट नोटा तेथे आढळून आल्या.

## महाकुंभात महिलांच्या व्हिडिओची विक्री करणाऱ्यांवर कारवाई होणार

**प्रयागराज :** प्रयागराज महाकुंभातील व्हिडीओ पोस्ट करणाऱ्या आणि विकणाऱ्या अकाऊंटविरोधात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. श्रद्धाळू महिलांचे आक्षेपार्ह व्हिडिओ, फोटो करून आणि टेलिग्रामवर विक्री करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहे. आता या लोकांची ओळख करून त्यांना अटक केली जाणार असल्याचे पोलीस महासंचालक प्रशांत कुमार यांनी सांगितले.

प्रयागराजला महाकुंभ सुरू आहे. त्यामुळे कोट्यवधी भाविक या महाकुंभात सामील झाले आहेत. विविध भाषा बोलणारे देशातील कानाकोपऱ्यातील लोक या महाकुंभात आले आहेत. फक्त देशातूनच नाही तर विदेशातूनही विदेशी पर्यटक महाकुंभात आले आहेत. या ठिकाणी श्रद्धेने पूजापाठ करत आहेत. संगमात जाऊन डुबकी मारत आहेत. मात्र, अशा ठिकाणी काही विकृत गोष्टीही घडताना दिसत आहे. काही लोक या महाकुंभात अंघोळ करणाऱ्या आणि कपडे बदलणाऱ्या स्त्रियांचे व्हिडीओ काढून ते विकत आहेत. त्यामुळे संताप व्यक्त केला जात असून पोलिसांनी अशा लोकांविरोधात कठोर कारवाई करण्यास सुरुवातही केली आहे.

महाकुंभात ५५ कोटी लोक आले आहेत. सर्व श्रद्धाळू गंगेत डुबकी मारत आहेत. गंगेत पवित्र स्नान करण्यासाठीच लोक या ठिकाणी येत आहेत.

मात्र, काही लोक या अंघोळ करणाऱ्या महिलांचे व्हिडीओ काढत आहेत. त्यांचे कपडे बदलतानाचे व्हिडीओ काढून इन्स्टाग्राम, फ ेसबुक, ट्विटर आणि टेलिग्रामवर पोस्ट करत आहेत. काही लोक तर हे व्हिडीओ विकतही आहेत. १९९ ते ३००० रुपयांपर्यंत हे व्हिडीओ विकले जात असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे.

## गजानन महाराज प्रकटदिनानिमित्त त्रिदेव मंदिर एन-७ येथे पिठलं, भाकरीचा प्रसाद वाटप



**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

एन -७ येथील त्रिदेव मंदिरात दरवर्षीप्रमाणे यंदाही श्री गजानन महाराजांच्या प्रकटदिनामित्त प्रसाद वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी शेकडो भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. गजानन महाराजांचे पूजन त्रिदेव मंदिरात करण्यात आला. गजानन महाराजांची आरती दुपारी १२ वाजता करण्यात आली. त्यानंतर प्रसादाचे वाटप करण्यात आले. मंदिरातील काही ज्येष्ठ भाविकांच्या माध्यमातून वर्षभर अन्नदानाचे वाटप करण्यात येते. सर्व धार्मिक कार्यक्रम त्रिदेव मंदिराअंतर्गत साजरे केले जातात. आता महाशिवरात्रनिमित्त देखील महाप्रसाद वाटप करण्यात येणार असल्याचे एका ज्येष्ठ भाविकाने सांगितले. त्रिदेव मंदिरातर्फे दिल्या जाणाऱ्या आजच्या प्रसादात पिठलं आणि ज्वारीची भाकरी, ठेचा असे पदार्थ होते.

## पुढच्या महिन्यात डॉलर शंभर रुपयावर, तरीही विरोधकांचे मौन- ॲड.प्रकाश आंबेडकर

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

एप्रिलपर्यंत डॉलरचा दर शंभर रूपयापर्यंत जाण्याची भीती असून यामुळे महागाई वाढण्याचा धोका आहे. तरीही विरोधक मौन पाळून गप्प आहेत अशी टीका ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी केली.

ॲड. आंबेडकर म्हणाले, पंतप्रधान मोदी अमेरिकेला गेल्यापासून डॉलरच्या तुलनेत रूपयाची घसरण सुरू आहे. आजच्या घडीला एक डॉलरसाठी ८८ रूपये मोजावे लागत आहेत. पुढील महिन्यापर्यंत डॉलरसाठी शंभर रूपये मोजावे लागतील. यामुळे रशिया वगळता अन्य देशातून इंधन तेल आयातीवर अधिक रक्कम मोजावी लागणार असून इंधन दरवाढीचा धोका आहे. इंधन दरवाढ होताच त्याचा परिणाम बाजारातील अन्य वस्तूंची महागाई वाढण्यावर होतो.

मोदींना ट्रम्प शासनाने भारतात जो आयातकर आकारला जाईल तोच कर अमेरिकेत आकारला जाईल असे सांगण्यात आले आहे. यामुळे अमेरिकेकडून मिळणाऱ्या व्यापार सवलती बंद होण्याच्या शक्यतेने शेअर बाजार कोसळत आहे.

सामान्य माणसाची क्रयशक्ती कमी झाल्याने बाजारात चलन फिरत नाही. यामुळे जीएसटी संकलनातही घट झाली असून याचा परिणाम विकास कामावर होणार आहे.

भारतीय अर्थव्यवस्थेवर मोठे संकट आले असताना विरोधक मात्र मौन पाळून गप्प आहेत. अदानीचे काय होईल ते व्यवस्था पाहून घेईल, सामान्य माणसाशी याचा संबंध नाही. मात्र, याचा बागुलबुवा उभा केला जातो आहे. वायूदलात आधुनिक यंत्रणा उपलब्ध होत नाही यामुळे चीनबरोबर युध्द झाले तर आपण जिंकू शकणार नाही असे प्रमुख सांगत आहेत.

राफेल खरेदी करार मनमोहन सिंग सरकारच्या काळात करण्यात आला. मोदी सरकारने सत्ता हाती घेताच हा करार रद्द करून अदानीकडून याचा पुरवठा केला जाईल असा निर्णय घेण्यात आला. आधुनिक यंत्रणा वायूदलाला हवी आहे, मात्र, केंद्र शासन याकडे गांभीर्याने पाहण्यास राजी नाही अशी टीकाही त्यांनी केली.

कुंभमेळा हा लोकांचा भावनिक, वैयक्तिक प्रश्न आहे. या कुंभ मेळाची उत्तर प्रदेश सरकारने सोय केली पण ज्या पद्धतीने कुंभमेळ्याचे मार्केटिग चाललेले आहे त्याचा निषेध आहे. कुंभमेळ्याच्या ठिकाणी झालेल्या दुर्घटनेत एक हजाराहून अधिक लोक मृत्यूमुखी पडले, मात्र, सरकार ३८ मृत झाल्याचे सांगत संख्या लपवत आहे.

हिंदू संघटनांनी मृतांच्या पार्थिवावर अंत्यविधी कसे केले हे सांगावे असे आवाहन करून ॲड. आंबेडकर म्ह णाले, धर्माचे राजकारण हे देशाला आता धोक्याच्या घटकेपर्यत पोचवत आहे. आज विरोधी पक्ष लकवा मारलेल्या परिस्थितीत गेला आहे. त्यातून त्यांनी स्वत।ला सावरत दुरुस्त करावे आणि हिटलरशाहीच्या सरकारचा विरोध करावा असेही ते म्हणाले.

## इस्त्रोचे मोठे यश, चंद्रयान-३च्या लँडरचा सुखद धक्का

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)**

विक्रमची चंद्रावर सॉफ्ट लँडिंग झाली असून मिशन पूर्ण झाले आहे.चंद्रयान-३च्या लँडरचा सुखद धक्का आहे. ही कामगिरी इस्त्रोचे मोठे यश मानले जाते. ऑगस्ट २०२३ मध्ये चंद्रयान-३ च्या लँडर विक्रमने सॉफ्ट लॅडिंग केली होती. त्यानंतर अंतराळाच्या इतिहासात नवीन आध्याय जोडला गेला होता. या मिशनमध्ये भारतीय अंतराळ संस्था (इस्त्रो) वैज्ञानिकांना एका नवीन आव्हानांचा सामना करावा लागला होता. विक्रमकडे अजून काही प्रोपेलेंट शिल्लक होते. त्यावेळी इस्त्रोमधील काही शास्त्रज्ञांचे मत होते की ते असेच वाया जाऊ नये. त्याच वेळी काही शास्त्रज्ञ म्हणत होते की, अभियान आधीच यशस्वी झाले आहे आणि आता कोणत्याही अतिरिक्त प्रयोगांची गरज नाही. यामुळे दोन मतप्रवाहन निर्माण झाले. शेवटी इस्त्रोने आपल्या योजनेत बदल केला. चंद्रावर विक्रम लँडरचा अप्रत्याशित 'हॉप' (उडी मारणे) प्रयोग करण्यात आला. विक्रम लँडर चंद्राच्या पृष्ठभागापासून ४० सेंटीमीटरवर उठला. त्यानंतर जवळपास ३०-४० सेंटीमीटर लांब जावून लँड झाला. विक्रम लँडरने मारल्या या उडीमुळे इस्त्रोचा वैज्ञानिकांना सुखद धक्का बसला. तसेच भविष्यासाठी चांगले संकेत मि ळाले. इस्त्रो प्रमुख व्ही. नारायणन हे सुद्धा त्यावेळी चंद्रयान - ३ मिशनमधील प्रमुख वैज्ञानिकांमध्ये होते. त्यांनी त्या दिवशाची आठवण करताना सांगितले की, लँडिंगच्या दिवशी खूप तणाव होता. परंतु, प्रोपेलेंट प्राणालीने पूर्ण काम केले.त्यानंतर चंद्रयान-३ चे लँडिंग झाले.हे मिशनचे मोठे यश होते. विशेष प्रोपेलेंटचा वापर करण्यासाठी त्यांनी इस्त्रोचे माजी अध्यक्ष एस सोमनाथ यांच्यासोबत चर्चा केली होती; परंतुत्यावेळी मिशनमध्ये सहभागी काही शास्त्रज्ञांनी या प्रयोगात रुची दाखवली आहे. याबाबत त्यांचे म्हणणे होते, विक्रमची चंद्रावर सॉफ्ट लँडिंग झाली आहे.त्यामुळे मिशन पूर्ण झाले आहे. अहमदाबादमधील फिजिकल रिसर्च लॅबोरेटरीमधील व्याख्यानात बोलताना नारायणन यांनी ही आठवण सांगितली.

# साहित्यिक व साहित्याचे प्रयोजन ?

**(राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या मुळ भाषणातील अंशातून )**

साहित्यिक व साहित्याचे प्रयोजन काय ? या प्रश्नाचे उत्तर देतांना राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज म्हणतात. मी साहित्य पुस्तकातून शिकलो नाही. अफाट जनसागरातून, हृदयाच्या गाभाऱ्यातून, आंतरिक उचंबळीतून मी साहित्य शिकलो. साहित्याची कल्पना ह्या जनसागरात मिळाली. पद्धतशीर जीवन जगण्याला सुरुवात जेथे झाली, तेथे साहित्यिकांचा समूह आला. पद्धतशीर जीवन जगण्याचे ज्ञान येणे, जीवनाचे सक्रिय-तत्त्वज्ञान समजू लागणे हे ज्याला साधले, तोच साहित्यिक व आचाराविचारातील शुद्धता, संकुचित वृत्तीचा लोप, संघर्षहीनता, परस्पर सहकार्याची ओढ, गरिबांबद्दल प्रेमभावना, समाजोन्नतीच्या कल्पना याविषयीच्या विचारांची निर्मिती म्हणजे साहित्य.

साहित्यिक व साहित्या बाबतची आपली भुमिका विशद करतांना महाराज पुढे म्हणतात, प्रत्येकाला आपली भावना विश्वव्यापी करावयाची आहे. प्रथम आप्त व नंतर विश्वालाच आपले घर मानणे, किंबहुना 'हे सारे चराचर विश्व माझेच स्वरूप आहे' ही जीवनाची अत्युच्च कल्पना असून ती साऱ्या समाजात पसरावयाची आहे. परंतु, या उच्चतेला पोहचण्यासाठी पायऱ्यांनी जावे लागुन अनुभव घ्यावे लागणार आहेत. महात्मा गांधीच्या सेवाग्रामला अखिल भारतीय कुंभार परिषदेत महाराज सहभागी झाले ते म्हणतात, साहित्य मी कुंभारांच्या सामानात, मडक्यातही पाहिले. मी तेही साहित्यच समजतो. जीवनाला सामान पुरविणारे, साहित्याचा पुरवठा करणारे ते सारे साहित्य ! काही साहित्य कलात्मक असेल, काही साहित्य कलात्मक नसेल, काही कलागुणात कमी पडेल. पण कलात्मकतेचा-अंश कमी असणारे जीवनसाहित्य हे साहित्यच नव्हे, असे म्हणता येणार नाही. असे वाद जगात सर्वत्र चालले आहे. नाट्यसाहित्य किती विशाल आहे ? सारे साहित्य जगाच्या पसाऱ्यात रंगले आहे.

आपापल्या परीने ह्या साहित्यातला रंग अनुभवावयाचा आहे. हा अनुभव घेणाऱ्या साहित्यिकात एखादा, परब्रह्माच्या महानंदात रमून साहित्याच्या पराकोटीला आपल्या साहित्यिक भावना नेऊ शकतो व महान साहित्यिक म्हणून तो अमरही ठरतो. त्याची कला, त्याचे साहित्य अजरामर विश्वात्मक ठरते. साहित्यिकांतील दशकानुशके चालत असलेल्या वादावर गुरुकुंज आश्रम येथे १९५३ मध्ये संपन्न झालेल्या साहित्य संमेलनच्या अध्यक्षीय भाषणातून भाष्य करतांना राष्ट्रसंत तुकडोजी महाराज म्हणतात, कुणी म्हणतात, विदर्भ साहित्य-संमेलनाचे प्रयोजन नाही. कुणाचा विरोध महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या आयोजनाला होतो. कुणाला हिंदी साहित्य संमेलनाची आवश्यकता नाही असे वाटते. परंतु ह्या कशाचेच प्रयोजन नाही असे नाही. प्रांतिक भाषांची किंवा एका राष्ट्रभाषेचीच संमेलने भरावी, असे नसून, कुटुंब साहित्याचीही संमेलने भरावी, ग्रामसाहित्याची संमेलने व्हावी, सर्व भारतीय भाषांची एकत्र संमेलने व्हावी, इतकेच नव्हे तर, विश्वसाहित्य संमेलनाचीही नितांत आवश्यकता आहे, अशी अपेक्षा महाराज मानव कल्याणासाठी व्यक्त करतात. मानव कल्याणासाठी साहित्यिकांकडून अपेक्षा व्यक्त करताना, राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज म्हणतात, माणसाला मानव करावयाचे आहे; त्याला दानव होवु द्यायचे नाही, त्याला सर्व जीवनाचे मनोहर हृदयंगम दर्शन घडवायचे आहे. त्यातले मांगल्य, त्यातले अभिजात सौंदर्य, त्यातले सारे वर्म व मर्म अनुभवावयाचे ज्ञान त्याला द्यावयाचे आहे. हे एक भव्य व दिव्य कार्य आहे, हे दिव्य कार्य साहित्यिकांनी करायला हवे आहे. परंतु बरेच साहित्यिक विकृतीच्या मार्गाने जातात असे खेदाने म्हणावे लागते. कला, बुद्धी वा भावना यांचा दुरुपयोग होतो, तो होऊ नये. आमच्या साहित्यिकांनीही आपल्या साहित्याचा दुरुपयोग होणार नाही यासाठी जागरूक असले पाहिजे. आम्हाला सर्व गोष्टींची गरज आहे. साहित्य हे मिरविण्यासाठी, झब्बूशाहीसाठी व दीन-दुबळ्यांच्या झोपडया चिरडण्यासाठी नाही. जगाला जागवण्यासाठी, जगाच्या निरीक्षणासाठी, जगाच्या विशालतेत विलीन होण्याचे शिक्षण घेण्यासाठी साहित्य आहे. साहित्याने भराभर उड्या मारत अथवा अंतराळातून उडत जायला नको. अशा तकलादू क्षणजीवी साहित्याचे भवितव्य विनाशाकडे वळणारे असते. असे साहित्य जिवंतही राहत नाही , त्याचा उपयोगही होत नाही व परिणामकताही त्यात उरत नाही. लढाईत शंभर वीरांवर वार करीत-मारीत समोर चाललात, मागे काय होत आहे इकडे तुमचे लक्ष नाही. वस्तुत: तुम्ही पुढे जात आहात आणि मागचे मरणारे उठून उभे होत आहेत. हे निष्फळ युद्ध आणि परिणाम न करणारी तुमची विनाशी कला एकाच कक्षेत येतात. याप्रमाणे लढणाऱ्या वीरांची गुलामी जशी नष्ट होत नाही तद्वतच तुमची ही वरवरची साहित्यनिर्मिती ही सुद्धा एक गुलामीच ठरते.

आमच्या समाजात उत्तम विचार, उत्तम गरजा यांची पूर्तता करावयाची आहे. तळमळ वाटणाऱ्यांनी हे करायला हवे. साहित्यिक त्यातून सुटत नाही. आचार-विचारांचा प्रचार नाही तोवर देश सुधारणेचा विचार व्यर्थ होय! आमच्या येथे शेकडा शंभर लोकांना तसा धर्म -समजतो पण त्यातही वास्तवता शेकडा दहांनाही कळत नाही. साप दिसला, भीती वाटली; झाला तो आमचा देव! झाड पडले, झाले झाड देव! जो आघात करील, जो दाखला देईल, तो आमचा धर्म होतो. आमच्या धर्मकल्पनांची, आमच्या सामाजिक जीवनाची ही अधोगती आहे. ही नष्ट व्हावी असे साहित्यिकास वाटणार नाही, तर तो साहित्यिक तरी कसला? संपूर्ण लोकात मानवता वाढावी, विषमतेची दरी मिटावी व अधमता सोडावी ही धर्माची प्रगती आहे. समाजाची उन्नती आहे. साहित्यिकांचा हातभार यासाठी लागावा; नाहीतर ते केवळ 'भुईला भार'च आहेत असे नाईलाजाने म्हणावे लागेल. मानवाच्या कल्याणासाठी साहित्याची आवश्यकता स्पष्ट करतांना राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज देशातील विषमतेचे उदाहरण देवुन म्हणतात, आमच्या समाजातल्या रूढ्यांनी आमचे जीवन बरबटले आहे. श्रीमंताच्या घरी जेवणावळी सुरु असतांना त्याचवेळी त्याच्याच घराबाहेर भुकेलेली माणसे उष्ट्या पत्रावळीवरील अन्न मिळविण्यासाठी आपसात भांडतांना दिसणारे चित्र भयावह आहे. ज्या देशात, ज्या प्रांतात, ज्या गावात साहित्य संमेलने भरावी, त्याच गावातल्या, त्याच प्रांतातल्या, त्याच देशातल्या साहित्यात मात्र प्राण्यांपेक्षाही खराब जीवन जगणाऱ्या अश्या दीन-दरिद्री भुकेकंगालांचे प्रतिबिंब उमटु नये, हा दैवदुर्विलासच नव्हे तर काय? साहित्याने आता ही जाणीव करून घेतली पाहिजे. त्याशिवाय साहित्याची व्याख्याच होऊ शकत नाही. महाराज म्हणतात काही साहित्यिकांचे साहित्य कदाचित दुसरे असू सकते. परंतु मला या देशात 'तरी तसे साहित्य नको आहे. मला मानव कल्याण साधणारे जीवनसाहित्य हवे आहे. समाजातल्या वैषम्याच्या भिंती, विषम स्थिती निवळणारे साहित्य व तसे साहित्य निर्माण करणारे साहित्यिक मला या देशात हवे आहेत. हे कार्य काही कीर्तनांनी करतील, काही भजनांनी करतील, काही कायद्यांनी करतील.

# साहित्य संमेलने : परंपरा आणि परिप्रेक्ष

**साहित्य** संमेलनाची परंपरा आता शतकी वाटचाल करीत आहे. मात्र या परंपरेत अनेक परिप्रेक्ष या साहित्यसंमेलने आणि त्यातून निर्माण होणाऱ्या साहित्य प्रवाह, संमेलनांचे स्वरुप, त्यातून व्यक्त होणारे विषय याबाबत अनेक परिप्रेक्ष तयार होतांना दिसतात. त्याचाच धांडोळा घेतलाय ज्येष्ठ पत्रकार आणि साहित्यीक प्रशांत गौतम यांनी. नवी दिल्ली येथे ७२ वर्षापूर्वी ऑक्टोंबर महिन्यात ५४ वे साहित्य संमेलन झाले होते. तेव्हा,महाराष्ट्र राज्याची निर्मितीही झाली नव्हती,आणि अ.भा.मराठी साहित्य महामंडळही अस्तित्वात नव्हते. या ५४ व्या साहित्य संमेलनाचे उद्घाटन तत्कालीन पंतप्रधान पंडीत नेहरु यांनी केले होते. अध्यक्ष होते तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी,आणि स्वागताध्यक्ष होते,काकासाहेब गाडगीळ. त्यानंतर दिल्लीत साहित्यसंमेलन होत आहे ते यंदाच. ९८ व्या संमेलनासाठी उद्घाटक म्हणून पंतप्रधान नरेंद्र मोदी लाभले आहेत,अध्यक्षपदाचा बहुमान डॉ. ताराबाई भवाळकर यांना मिळाला आहे. तर स्वागताध्यक्ष म्हणून शरद पवार आहेत.मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला,त्या अनुषंगाने देशाच्या राजधानीत होणाऱ्या साहित्य संमेलनास महत्व आहे.

दोन मराठी माणसं एकत्र आली की साहित्य संस्था निर्माण होतात, असे म्हणतात ते खरेच आहे. आधीच्या काळात तेच होते, आणि आताच्या काळात ही तेच आहे. यात काहीही बदल झालेला नाही. संस्था व संमेलने वर्धिष्णू असतात. वर्षानुवर्ष हा साहित्याचा प्रवाह हा अखंड सुरुच असतात. साहित्य संमेलनाची परंपरा आता शतकाकडे जाते आहे. या प्रदिर्घ कालखंडात किती तरी बदल झाले. स्वातंत्र्यपूर्व काळात मराठी भाषेचे अस्तित्व टिकवण्यासाठी संस्था आल्या. नंतर त्यांचा विस्तार झाला. पुढील काळात याच साहित्य संस्थांचे अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ अस्तित्वात आले. संमेलने त्या आधीही 'ग्रंथकार संमेलन, महाराष्ट्र साहित्य संमेलन',या नावाने भरतच होती. तेव्हा निवडणूक नव्हती.

१९६४ साली अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ स्थापन करण्याचा निर्णय झाला,आणि १९६५ साली महामंडळाचे पहिले संमेलन हैदराबादेत समीक्षक प्रा.वा.ल कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली भरले. तेव्हा पासून ही परंपरा अखंडीत आहे. नवी दिल्लीत तर यंदाचे संमेलन ७२ वर्षाने होत आहे. हे संमेलन झाले तेव्हा म हाराष्ट्र राज्याची निर्मितीही झाली नव्हती. तो काळ संयुक्त महाराष्ट्र चळवळीने भारावलेला होता. दिल्लीचे संमेलन १९५४ साली झाले आणि १ मे १९६० साली महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आले. आणि मराठी साहित्यात साठोत्तरी प्रवाह यायला सुरूवात झाली.

मराठवाड्याच्या संदर्भात सांगायचे तर आजपर्यंत मराठवाड्यात झालेल्या सात संमेलनाचे अध्यक्षपद मराठवाड्याबाहेरील लेखकांनी भूषवले. केवळ एका संमेलनाचे अध्यक्षपद भूमीपुत्र भारत सासणे यांनी भूषवले. अनंत काणेकर (छत्रपती संभाजीनगर), शंकर पाटील (नांदेड), व्यंकटेश माडगुळकर (अंबाजोगाई), नारायण सुर्वे (परभणी), प्रा.द.मा.मिरासदार (परळी), प्रा.रा.ग.जाधव (छत्रपती संभाजीनगर), फादर फ्रान्सिस दिब्रिटो (धाराशीव), भारत सासणे (उदगीर) असे सांगता येईल. तर मराठवाड्यातील लेखक डॉ.यू.म.पठाण (पुणे), डॉ.नागनाथ कोत्तापल्ले (चिपळून), प्रा.फ.मु. शिंदे(सासवड), लक्ष्मीकांत देशमुख (बडोदा), डॉ. श्रीपाल सबनीस (पिंपरी-चिंचवड), नरेंद्र चपळगावकर(वर्धा) येथील साहित्य संम ेलनाचे अध्यक्ष होते.

९८ वे
अखिल भारतीय
मराठी साहित्य संमेलन, दिल्ली
२०२५

मराठी साहित्य संस्कृती,कशी असते हे पाहयचे असेल तर साहित्य संमेलन चळवळीचा इतिहास आणि सद्याचे वर्तमान बघायला हवे. जगात मराठी ही अशी भाषा आहे की फक्त तिचाच साहित्य संमेलनाचा उत्सव उदंड उत्साहात होत असतो. आज सर्वाधिक साहित्य संमेलने ही मराठी भाषेचीच होतात. तालुका, जिल्हा, विभाग, राज्य पातळीवर तर मोठ्या संख्येने संमेलने होतात. विश्व मराठी साहित्य संमेलन होतात; पण कायम लक्षात राहातात ती प्रतिवर्षी होणारी अ.भा.मराठी साहित्य संमेलने. ही संमेलने नव्या-जुन्या लेखकांना हक्काचे व्यासपीठ देतात, वाचकांना आपल्या आवडीचा लेखक भेटतो आणि ग्रंथ प्रदर्शनातून त्याचे आवडीचे पुस्तक मिळते. अशा ग्रंथ प्रदर्शनातून प्रकाशकांनाही फायदा होतो. १९८९ साली पहिली जागतिक मराठी साहित्य परिषद मुंबईयेथे कुसुमाग्रजांच्या अध्यक्षतेखाली भरली होती. नंतरच्या काळातही सातत्य राहिले. साहित्य म हामंडळानेही अशा तीन चार जागतिक मराठी साहित्य संमेलनाचे आयोजन केले होते. यात गाजले ते सॅन होजे व (अमेरिका), दुबई येथील संमेलन, या निमित्ताने मराठीचा झेंडा साता समुद्रापार फडकला. राज्य सरकारने प्रतिवर्षी जिल्हा व विभागीय स्तरावर मराठी साहित्य संमेलन भरवण्याचा चांगला उपक्रम सुरू केला आहे. छोट्या व आटोपशीर संमेलनास प्रतिसादही उत्तम लाभतो. तसेच राज्य सरकारने तीन विश्व मराठी साहित्य संमेलनं आयोजित केली. मुंबई, नवी मुंबई आणि पुणे. पुण्यात नुकत्याच झालेल्या विश्वसंमेलनात तर कोट्यावधीची आर्थिक उलाढाल झाली, विक्रमी पुस्तक विक्री झाली. म्हणून प्रत्येक रसिक,वाचकांना साहित्य संमेलनाची उत्सुकता असते,तशी देशाच्या राजधानीत होणाऱ्या संमेलनाचीही आहे.



**लेखक- प्रशांत गौतम**
**साहित्यिक,ज्येष्ठ पत्रकार**

**बृहन्महाराष्ट्रातील संमेलने**

या मराठी साहित्य संमेलनास अनेक परंपरा आहेत. या ९८ वर्षातील २४ संमेलनं ही महाराष्ट्रा बाहेर झालेली आहेत. बडोदे, इंदूर, ग्वाल्हेर, बेळगाव, मडगाव, हैदराबाद, कारवार, अहमदाबाद, नवी दिल्ली, भोपाळ, रायपूर(छत्तीस गड) पणजी, घुमान(पंजाब) यातील काही ठिकाणी दोन-तीन वेळा संमेलने भरली आहेत. बृहन्महाराष्ट्रात तर बडोदा येथील वाड.मय परिषद यांची संमेलन वाटचाल अमृत महोत्सवाकडे सुरू आहे. नवी दिल्ली येथील बृहन्महाराष्ट्र मंडळाचीही तेवढीच अधिवेशनं झालीत. या शिवाय अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनंही एका काळात भरली होती.

**परंपरेची रुजुवात**

न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांनी सुरू केलेली १८७८ पासून सुरु असलेली ही परंपरा अखंडीत राहिली असती, त्यात सातत्य राहिले असते तर दिल्लीचे संमेलन हे ९८ ऐवजी १४७ वे ठरले असते. या प्रवाहात विविध कारणाने खंड पडला; हे मात्र खरे. स्वातंत्र्यपूर्व काळात संमेलनाचे आयोजन करणे ही साधी बाब नव्हती, त्यावर मात करीत संमेलन सातत्य राखण्याचा प्रयत्न तत्कालीन लेखक व कार्यकर्त्यांनी केला होता. तेव्हा पासूनचा आज पर्यंतचा साहित्य संमेलनाचा प्रवास फारच रंजक आहे,कसा तो आपण जाणून घेवू या!

**साहित्यसंमेलनांची परंपरा**

यंदाच्या संमेलनाच्या अध्यक्ष डॉ. ताराबाई भवाळकर या नियोजित आहेत. आयोजक पुण्यातील सरहद्द संस्था आहे. संजय नहार हे संस्थापक अध्यक्ष आहेत. सरहद्दचे कश्मीर भागात उत्तम,शैक्षणिक, सामाजिक काम आहे. याच आयोजकांनी संत साहित्याचे अभ्यासक डॉ. सदानंद मोरे यांच्या अध्यक्षतेखाली घुमान येथील ८८ वे साहित्य संमेलन चांगले आयोजित केले होते. नंतरच्या वर्षी बहुभाषा संमेलनही डॉ. गणेश देवी यांच्या अध्यक्षतेखाली घुमान येथेच घेतले होते. दिल्ली येथील साहित्य संमेलनाचेही तेच आयोजक आहेत.

पहिले मराठी साहित्य संमेलन ७ फेब्रुवारी १८७८ या दिवशी पुण्यात न्या. महादेव गोविंद रानडे यांच्या अध्यक्षतेखाली भरले होते. या संदर्भात 'ज्ञानप्रकाश ' या नियतकालिकात रानडे आणि लोकहितवादी(गोपाळ हरी देशमुख)यांचे संयुक्त निवेदन प्रसिध्द झाले. ग्रंथकार संमेलन भरविण्याचा प्रस्ताव आला, त्यास ५० साहित्यिकांचा पाठिंबा होता. खरे तर रानडे यांचे एकही पुस्तक नसले तरी त्यांनीच संमेलनाचे अध्यक्षपद भूषवावे, असा लोकहितवादींसह अन्य प्रतिष्ठीत लेखकांचा आग्रह होता. २४ मे १८८५ या दिवशी पुण्यात दुसरे ग्रंथकार संमेलन झाले. कृष्णाशास्त्री राजवाडे हे अध्यक्ष होते. संमेलनासाठी न्या.रानडे यांनी पुढाकार घेतला होता. तो काळ होता संयुक्त महाराष्ट्र लढ्याचा. साल होते १९५७. तत्कालीन औरंगाबाद आणि आताचे छत्रपती संभाजनगर येथे लघुनिबंधकार अनंत काणेकर यांच्या अध्यक्षतेखाली साहित्य संमेलन सरस्वती भुवन प्रशालेत झाले. मराठी साहित्यातील ऐकापेक्षा एक दिग्गज लेखक-दत्तो वामन पोतदार, कुसुमाग्रज, आचार्य अत्रे, पु.ल.देशपांडे, वसंत बापट, विंदा करंदीकर, मंगेश पाडगावकर अशी ग्रेट मंडळी हजर होती. यात ',संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे ',असा ठराव मंजूर झाला. पु.ल.देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली इचलकरंजीत सुवर्ण महोत्सवी संमेलन झाले. कराडला जेव्हा १९७५ साली आणीबाणीच्या काळात जे अ.भा.मराठी साहित्य संमेलन झाले. त्याच्या अध्यक्ष दुर्गाबाई भागवत तर स्वागताध्यक्ष यशवंतराव चव्हाण होते. मराठवाडा विद्यापीठ नाम ंतराच्या प्रश्नाने पुण्यातील पु.भा.भावे यांच्या अध्यक्षते खालचे व कथालेखक वा.कृ. चोरघडे यांच्या अध्यक्षतेखालचे चंद्रपुर येथील संमेलन फारच गाजले होते. १९८१ मध्ये ५६ वे संमेलन मध्यप्रदेशात रायपूर येथे झाले.अध्यक्ष होते गंगाधर गाडगीळ. नगर येथे झालेले संमेलन उंचीवर नेणारेच होते. ऐतिहासिक कादंबरीकार ना.स.इनामदार अध्यक्ष होते. गुलजार उद्घाटक तर गिरीष कर्नाड समारोपात होते. एप्रिल १९९८ मध्ये परळी वैजनाथ येथे साहित्यसंमेलन झाले. द.मा.मिरासदार हे संमेलनाचे अध्यक्ष होते. समारोपात ज्ञानपीठ पुरस्कार विजेत्या लेखिका महाश्वेतादेवी हजर होत्या.आशा भोसले यांच्या गाण्यांची मैफल रंगली होती, अशा प्रकारे सामाजिक प्रश्नांवरही साहित्यसंम ेलनातून भुमिका मांडण्यात आली आहे.

**महिला अध्यक्षांची परंपरा**

शतकाकडे वाटचाल करणाऱ्या या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष म्हणून महिलांना मान मिळाला तो सहा महिला साहित्यिकांना. कुसुमावती देशपांडे(ग्वाल्हेर), दुर्गा भागवत(कराड), शांताबाई शेळके(आळंदी), डॉ.विजया राजाध्यक्ष(इंदूर), डॉ.अरुणा ढेरे(वर्धा)आणि आत्ताच्या संमेलनाच्या नियोजित अध्यक्ष डॉ.ताराबाई भवाळकर(नवी दिल्ली).

संमेलन गाजतात लक्षात राहातात ती उत्तम नियोजन,भोजन व्यवस्थेमुळे. अशा संमेलनातून ग्रंथ विक्री उदंड होते,ती संमेलने यशस्वी होतात. संमेलन म्हटले की वाद-विवाद सोबतच येतात. असे असले तरी जगभरातील मराठी भाषक संमेलनावर फार प्रेम करतो,गर्दी करतो. संमेलन येण्याची उत्सुकता साहित्यप्रेमी वाचकांना असते आणि संमेलन संपले की रिकाम्या मांडवाकडे पाहून हुरहुर वाटते,आणि काही दिवसांनी पुन्हा संमेलनाचे दिवस आनंद घेवून येतात..

## भाजप अनुसूचित जाती मोर्चाच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे गुरु रविदास जयंती साजरी

**लातूर (अमरजीत बनसोडे)**– भारतीय जनता पार्टी अनुसूचित जाती मोर्चाच्या वतीने गुरु रविदास महाराज जयंती निमित्त लातूर येथील रविदास मंदिर येथे गुरु रविदास महाराज यांच्या प्रतिमेस व बाबासाहेब आंबेडकर चौक येथील बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. जयंतीनिमित्त प्रा. वैशाली कबाडे यांचे जाहीर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमास भाजप लातूर शहर जिल्हाध्यक्ष देविदास काळे, सरचिटणीस रवी सुडे, प्रदेश सरचिटणीस संजय सोनकांबळे, केशव कांबळे, भाजप जिल्हा उपाध्यक्ष अनिल कबाडे, आतिश कांबळे, भरत लोंढे, विजय बाबा गायकवाड, अनुसूचित जाती मोर्चा सरचिटणीस रत्नमाला घोडके सुमित्रा बनसोडे प्रगती डोळसे, सुनिता उबाळे, संगीताताई शिंदे ,आदी उपस्थित होते. या कार्यक्रमास प्रशांत माने, कुणाल कांबळे, आदींनी परिश्रम घेतले.

# साखरेच्या किंमती वाढण्याची शक्यता

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था):** मागील एका महिन्यात भारतातील साखरेच्या किंमतीत ६.५ टक्क्यांनी वाढ झाली आहे. खराब हवामान आणि साखर निर्यातीमुळे साखरेचा तुटवडा निर्माण झाला असून साखरेच्या किंमतीत आणखी वाढण्याची शक्यता आहे. साखर हा सर्वसामान्यांच्या दैनंदिन जीवनशैलीचा महत्त्वाचा भाग असल्याने येणाऱ्या काही महिन्यात साखर महागणार असल्याचे सांगण्यात येते.

उद्योगाच्या अंदाजानुसार असे दिसून आले आहे की, १५ फेब्रुवारीपर्यंत भारताचे साखर उत्पादन दरवर्षी पेक्षा १२ टक्क्यांनी घटले आहे. प्रतिकूल हवामान आणि दोन वर्षानंतर साखर निर्यात पुन्हा सुरू झाल्याने साखर उत्पादनात कमतरता निर्माण झाली आहे. तसेच साखरेच्या उत्पादनात घट झाल्यामुळे साखर पुरवठा



कमतरता निर्माण झाली आणि साखरेच्या किंमती वाढवल्या. कमी ऊस उपलब्धता आणि साखर कारखाने लवकर बंद झाल्यामुळे साखरेच्या किंम तीवर परिणाम झाला होता.

ऑक्टोबर ते मे अथवा जूनपर्यंत म्हणजे ४ ते ६ महिने सुरू असतात. यावर्षी उसाच्या तुटवड्यामुले यापूर्वीच बहुतांश साखर कारखाने बंद झाले आहेत. गेल्यावर्षी ५०५ साखर कारखान्याच्या तुलनेत यंदा केवळ ४५४ साखर कारखान्यांनी गाळप सुरू सुरू केले. १ फेब्रुवारीपर्यंत उसाअभावी ७७ साखर कारखाने बंद झालेत तर मागील वर्षी केवळ २८ साखर कारखाने बंद झाले होते. याच काळात गेल्यावर्षी ४७७ कारखाने सुरू होत, तर सध्या ३७७ साखर कारखान्यांचा गाळीत हंगाम अद्याप सुरू आहे. नॅशनल फेडरेशन ऑफ कोऑपरेटिव्ह शुगर फॅक्टरीच्या आकडेवारीनुसार, आतापर्यंत बंद झालेले बहुतेक साखर कारखाने महाराष्ट्र आणि कर्नाटक या भारतातील दोन शुगर उत्पादक राज्यांतील आहेत. एनएफसीएसएफ आणि भारतीय साखर आणि बायो-एनर्जी मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन यासह,काही उद्योग संस्थांनी मागील वर्षाच्या तुलनेत २०२४-२५ मध्ये साखर उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता व्यक्त केली आहे. एनएफसीएसएफच्या आकडेवारीवरून असे दिसून आले आहे की, १५ फ ेब्रुवारीपर्यंत साखर उत्पादन १९७.६५ लाख टन होते. गेल्यावर्षी याच तारखेला २२४.७५लाख टन होते, असे देखील नॅशनल फेडरेशन ऑफ कोऑपरेटिव्ह शुगर फॅक्टरीने स्पष्ट केले आहे.

# उपराष्ट्रपती जगदीप धनखड शनिवारी देणार घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग आणि वेरूळ लेणी भेट; प्रशासन सज्ज



**खुलताबाद (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

खुलताबाद तालुक्यातील वेरूळ येथे उपराष्ट्रपती जगदीप धनखड येत्या शनिवारी खुलताबाद तालुक्यातील बारावे ज्योतिर्लिंग घृष्णेश्वर मंदिर आणि जगप्रसिद्ध वेरूळ लेणींची भेट देणार आहेत.या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासन आणि पोलिसांनी जोरदार तयारी सुरू केली आहे.

उपराष्ट्रपतींच्या आगमनासाठी वेरूळ येथे तात्पुरते हेलिपॅड तयार करण्यात आले आहे. त्यांचे हेलिकॉप्टर येथे उतरणार असून, या ठिकाणी पोलीस अधीक्षक विनय कुमार राठोड यांच्या नेतृत्वाखाली सुरक्षा व्यवस्थेचा आढावा घेण्यात आला.

यावेळी घृष्णेश्वर मंदिर देवस्थानचे अध्यक्ष योगेश टोपरे, कार्यकारी विश्वस्त संजय वैद्य, मिलिंद शिवाळे, दीपक अग्निहोत्री, राजेंद्र कोशिंके आणि विविध शासकीय विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

**सुरक्षा व्यवस्थेत उपविभागीय अधिकारी** – संतोष गोरड, उपविभागीय पोलीस अधिकारी विजयकुमार ठाकुरवाडी, तहसीलदार स्वरूप कंकाळ, सार्वजनिक बांधकाम विभागाचे शाखा अभियंता दिलीप कोलते, महावितरणचे शाखा अभियंता उस्मान खान, पोलीस निरीक्षक धनंजय फराटे, तसेच ग्रामीण वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक गणेश पवार यांचाही सहभाग होता.

कडेकोट पोलीस बंदोबस्त:

उपराष्ट्रपतींच्या आगमनावेळी घृष्णेश्वर मंदिर आणि वेरूळ लेणी परिसरात कडेकोट पोलीस बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे. अनुचित प्रकार टाळण्यासाठी पोलीस अधीक्षक राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली सुरक्षा अधिकाऱ्यांची तैनाती केली जाणार आहे.

# पालकमंत्री यांनी तालुक्यात घरकुलच्या लाभार्थीसाठी शासकीय वाळू डेपो सुरू करण्याचे आदेशित केले



**खुलताबाद (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

पालकमंत्री संजय शिरसाठ यांना आरपीआय आठवले पक्षाच्या वतीने तालुक्यात वाळू केंद्र(डेपो ) सुरू करण्याचे निवेदन देताच मंत्री महोदयांनी दिले. निर्देश खुलताबाद तालुक्यातील आर.पी. आय. (आठवले ) पक्षाचे युवा तालुका अध्यक्ष राहुल काळे संजय जाधव व घरकुल लाभार्थी यांनी पालकमंत्री संजय शिरसाठ यांना निवेदन दिले होते या निवेदनांचे अनुषंगाने तात्काळ पालकमंत्री महोदयांनी निवेदनाची गंभीरतेने, दखल घेऊन खुलताबाद तहसीलदार यांना तात्काळ घरकुल लाभार्थींना शासकीय वाळू केंद्र सुरू करून प्रत्येक लाभार्थींना मोफत पाच ब्रास वाळू उपलब्ध करून देण्यासंदर्भात तहसीलदार यांना निर्देश देताच तहसील प्रशासन कामाला लागलेचे चित्र सध्या तहसील कार्यालयाच्या हालचालीवरून दिसत आहे या संदर्भात, तहसीलदार स्वरूप कंकाळ यांची भेट आरपीआय पक्षाचे युवा तालुका अध्यक्ष राहुल काळे, सामाजिक कार्यकर्ते संजय जाधव, वसंत शिरसाठ व घरकुल लाभार्थी यांच्यासह

मंत्री महोदयांनी दिलेल्या निवेदनावर तहसीलदारांना आदेशित करण्यात आलेल्या या विषयावर सविस्तर चर्चा केली तेव्हा तहसीलदार यांनी उपविभागीय अधिकारी यांच्याशी चर्चा करून लवकरच घरकुल लाभार्थींना शासकीय वाळू डेपो सुरू करण्याचे आश्वासन यावेळी दिले.. तालुक्यातील घरकुल लाभार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे मात्र याकडे आता गोरगरीब घरकुलच्या लाभार्थ्यांना शासकीय वाळूचा लाभ तहसील प्रशासन कधी मिळवून देणार याकडे त्यांचे लक्ष लागले आहे..

# श्रीराम वाचनालयात छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी



**सेलू/संजय धारासूरकर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

हिंदवी स्वराज्य संस्थापक आणि महाराष्ट्र चे आराध्यदैवत छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती जालना येथील ग्रंथ संग्रहालय श्रीराम वाचनालय येथे (दि.१९) रोजी साजरी करण्यात आली.

प्रारंभी ग्रंथ संग्रहालय श्रीराम वाचनालयाचे सचिव श्रीकांत शेलगावकर व नूतन विद्यालयाचे शिक्षक माधव ढाकणे यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. माधव ढाकणे मनोगत व्यक्त करताना म्हणाले कि, छत्रपती शिवाजी महाराजांनी अनेक अरबी, उर्दु व फारसी भाषेतील शब्दांना पर्यायी शब्दांसाठी विद्ववान पंडितांची नियुक्ति करुन आपल्या भाषेचे संरक्षण व संवर्धन झाले पाहिजे यासाठी त्यांनी प्रयत्न केले. छत्रपती शिवाजी महाराजांनी प्रतिकुल परिस्थितीवर मात करुन अदिलशाही,निजामशाई,मोगलशाई या परीकीय सत्तांना नेस्तीनाबूत करुन स्वतःच स्वराज्य महाराष्ट्रात निर्माण केले. बाल वाचक वल्लभ शेलगावकर व वाचक ओम आहेर,कृष्णा पत्की यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन शाम शेलगावकर यांनी तर आभार शैलेंद्र बदनापुरकर यांनी मानले. पांडुरंग काळे,प्रतिमेश शेलगावकर,रेणुका गुल्लापेल्ली,महेंद्र होलानी,कैलासचंद्र सराफ,मयंग गुल्लापेल्ली,सोपानदेव सरनाईक,धुंडीराम पाजणकर,रामकृष्ण खैरे,प्रशांत गुजर याची उपस्थिती होती.

# शिवजयंतीनिमित्त 'जय शिवाजी-जय भारत यात्रा' उत्साहात;मान्यवरांचा सहभाग



**छत्रपती संभाजीनगर–** छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३९५ व्या जयंतीनिमित्त 'जय शिवाजी– जय भारत' या पदयात्रेचे आयोजन करण्यात आले. विविध मान्यवर, नागरिक, विद्यार्थी या यात्रेत उत्साहात सहभागी झाले. पारंपारिक वेशभूषा व साहसी खेळांच्या सादरीकरणाने लक्ष वेधून घेतले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या क्रांतीचौक येथील पुतळ्याजवळ सकाळी साडेसात वाजता इतर मागास बहुजन कल्याण तथा दुग्धविकास व अपारंपारिक उर्जा मंत्री अतुल सावे, विभागीय आयुक्त दिलीप गावडे, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, अपर जिल्हाधिकारी डॉ. अरविंद लोखंडे, निवासी उपजिल्हाधिकारी विनोद खिरोळकर, उपजिल्हाधिकारी संगिता राठोड, जिल्हा क्रीडा अधिकारी बाजीराव देसाई यांच्यासह अनेक मान्यवरांच्या हस्ते शिव प्रतिमेचे पूजन करुन यात्रेस सुरुवात करण्यात आली. ढोल पथक, लेझीमच्या तालावर यात्रेची सुरुवात झाली.

तलवारबाजी, सायकलींग, स्केटिंग, मल्लखांब, जिमनॅस्टिक, योगासन, पोवाडा, पाळणागीत इ. सादरीकरण यात्रेत करण्यात येत होते. त्यास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. क्रीडा ज्योतही मान्यवरांच्या हस्ते नेण्यातआली. पैठण गेट, गुलमंडी मार्गे या पदयात्रेचा समारोप औरंगपुरा येथील महात्मा फुले पुतळ्याजवळ करण्यात आला.

# न्यू गुरुकुल इंग्लिश स्कूल वाहेगाव येथे शिवजन्मोत्सव आनंद सोहळा संपन्न



**गंगापुर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

गंगापूर तालुक्यातील वाहेगाव येथे २० फेब्रुवारी रोजी सकाळी ठीक १० वाजता न्यू गुरुकुल इंग्लिश स्कूल च्या प्रांगणात शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली असून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आली असून आलेल्या मान्यवरांचा सत्कार सोहळा देखील संपन्न झाला यावेळी शाळेमध्ये व्याख्यान पोवाडा सांस्कृतिक कार्यक्रम देखील घेण्यात आली ,शाळेतील न्यू गुरुकुल इंग्लिश स्कूल वाहेगाव चे संचालक श्री बाबासाहेब हिवाळे शाळेचे मुख्याध्यापक श्री अरुण शिरसाठ , व्यवस्थापक श्री दिपक गणराज , विशाल माने समीर शेख ,आकाश खामकर ,हसन शहा , शफिक शेख , महेश सोनवणे , प्रियंका हिवाळे ,ख्रिस्तीना गणराज ,मिस पाटील , कलिम शहा , शेख , वालतुरे , तगरे ,गोरे , आदी शिक्षक व कर्मचारी तसेच विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते .

# शिवजयंती निमित्त देवगिरी महाविद्यालयात विद्यार्थी आणि कर्मचारी यांनी केले रक्तदान



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

१८ फेब्रुवारी २०२५ देवगिरी महाविद्यालयातील एनसीसी, एन एस एस व क्रीडा विभागाच्या वतीने शिवजयंतीचे औचित्य साधून संजीवनी रक्तपेढी छत्रपती संभाजी नगर आणि देवगिरी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने या रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सदरील शिबिरात एकूण ९८ विद्यार्थी आणि कर्मचारी यांनी रक्तदान केले.

या रक्तदान शिबिराचे उद्घाटन मशिप्र मंडळाचे उपाध्यक्ष श्री.सलीम शेख यांच्या हस्ते संपन्न झाले याप्रसंगी मशिप्र मंडळ कार्यकारिणी सदस्य, श्री.त्रिंबकराव पाथरीकर यांची प्रमुख उपस्थिती होती. शिवजयंतीचे औचित्य साधून रक्तदान शिबिराचे आयोजन हा नव उपक्रम देवगिरी देवगिरी महाविद्यालयाने आयोजित केला आहे या माध्यमातून रक्तदान ही चळवळ बनली पाहिजे असे प्रतिपादन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अशोक तेजनकर यांनी केले. याप्रसंगी महाविद्यालयचे उपप्राचार्य डॉ.रवी पाटील, डॉ.अपर्णा तावरे, डॉ.गणेश मोहिते यांची प्रमुख उपस्थिती होती. राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ.अनंत कणगरे, डॉ.भाऊसाहेब शिंदे, डॉ सुवर्णा पाटील राष्ट्रीय छात्र सेनेचे कॅप्टन डॉ.परशुराम बाचेवाड, कॅप्टन डॉ.सुलक्षणा जाधव, क्रीडा विभाग प्रमुख डॉ.शेखर शिरसाठ आणि संजीवनी रक्तपेढीचे संचालक श्री लक्ष्मण नवले यांच्या पुढाकारातून हे रक्तदान शिबिर संपन्न झाले.

# दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त संचालक माहिती कार्यालयात अभिवादन



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

मराठी वृत्तपत्राचे जनक, दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त आज संचालक माहिती कार्यालयात सहायक अधीक्षक प्रविण भानेगावकर यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

प्रदर्शन सहायक राजेंद्र वाणी, कार्यालयातील कर्मचारी दशरथ वानोळे, इंदुबाई गावंडे, पांडुरंग जाधव, शेख अब्दुल रहेमान, अनिल बिरोटे, अशोक सुरडकर, गणेश सुरासे यांनीही बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून यावेळी अभिवादन केले.

# समाजापुढे आदर्श निर्माण होईल असे सतेज कार्य करा – प्रा. गवळे

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

महाराष्ट्रातील विविध ज्वलंत प्रश्नांना वाचा फोडून न्याय देण्यासाठी सदैव तत्पर असणाऱ्या रिपब्लिक क्रांती दल सामाजिक संघटनेचा तिसरा वर्धापन दिन ( ता.१९) रोजी महात्मा गांधी भवन छत्रपती संभाजीनगर येथे संपन्न झाला. छत्रपती शिवाजी महाराज, डॉ

बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. समता ,स्वातंत्र्य, बंधुता, न्याय , आणि रिपब्लिकन विचारधाराया घटकांना समाजातील शेवटच्या टोकापर्यंत पोहोचवण्यासाठी संघटनेच्या माध्यमातून आम्ही सदैव तत्पर आहोत.

समाजापुढे आदर्श निर्माण होईल अशी सतेज कार्य करा असे आवाहन पदाधिकारी कार्यकर्ते यांना संबोधित करताना संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. अनिल गवळे यांनी केले. प्रमुख मार्गदर्शक संघटनेचे राष्ट्रीय सल्लागार मास्टर के के अनिल कांबळे, ज्येष्ठ



साहित्यिक विचारवंत प्रा. मिलिंद ठोकळे तर कार्यक्रमाचे उद्घाटक सुमित भैया त्रिवेदी, स्वागत अध्यक्ष सुरज खाजेकर प्रमुख अतिथी म्हणून संघटनेचे राज्य प्रवक्ते शेषराव निकाळजे, संपर्कप्रमुख गौतम वाकडे, राज्याचे संघटक डॉ. लक्ष्मण ढवळे, सह संघटक दिनकर नरवडे, तर प्रमुख उपस्थिती म्हणून कार्यक्रमाला शुभेच्छा देण्यासाठी बसपाचे जिल्हाध्यक्ष विजय बचके , मिलिंद महाविद्यालयाचे प्रा. गौतम होनवडजकर, कला महाविद्यालयाचे डॉ. रमेश गायकवाड, लोक सेवा महाविद्यालयाचे डॉ. विजय सुर्वे, आंबेडकर महाविद्यालयाचे प्रा. डॉ. परमेश्वर वाघमारे, प्रा. देवानंद पवार, समाधान सावंत,कडूबा जंगले, अशोक वाघमारे, विजय बनसोडे, जालना जिल्हा अध्यक्ष सतीश बोराडे, मराठवाडा महासचिव इलियास शेख, शासकीय वैद्यकीय समुपदेशक डॉ. तेजस्विनी तूपसागर, जिल्हाध्यक्ष बाबासाहेब बोरुडे,, दिलीप व्यवहारे, सचिन महापुरे, राहुल साळवे, निलेश धडे, विठ्ठल मस्के, जानराव पाखरे, संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष भारत कोतकर, भूषण वाघ, जिल्हा महासचिव अरुण मुग दाल, जिल्हा सचिव योगेश वाघमारे, जिल्हा सहसंघटक ग्रामपंचायत बाभूळगाव चे उपसरपंच विठ्ठल नरवडे, जिल्हा सचिव गोकुळ जाधव,, गणेश बगळे, निर्मलाताई भगुरे, उषाताई सावंत, पैठण तालुका अध्यक्ष अमोल पवार, शहराध्यक्ष जितेंद्र खिल्लारे, शहर उपाध्यक्ष प्रवीण गवळे, शहर संघटक गंगाधर कांबळे, जिल्हा सह संघटक दिलीप फंदे, गंगापूर तालुका अध्यक्ष सुरेश चक्रनारायण, उपाध्यक्ष अनिल गाडेकर, जिल्हा संघटक दिनेश काळे, सिल्लोड तालुका अध्यक्ष रोहन मोरे, सोयगाव तालुका अध्यक्ष मोहन मंडलिक, वैजापूर तालुका अध्यक्ष साईनाथ त्रिभुवन, खुलताबाद तालुका अध्यक्ष उमेश भुजंग, वाळूज महानगर प्रमुख अभिजीत रण येवले, महेंद्र मुगदल, सतीश भालेराव, सचिन हिवराळे, राहुल मतिंगे, राहुल बोरुडे, प्रा. मोरे सर, प्रभाकर ढोले, फुलंब्री तालुका अध्यक्ष तेजप्रकाश तुजाते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रवीण आव्हाड यांनी केले तर आभार मोहसीन पठाण यांनी केले.

## पोलीस मित्र संघ महाराष्ट्र राज्य छत्रपती संभाजीनगर शाखेचे उद्घाटन



मोहिते पाटील यांना विशेष कार्यकारी अधिकारी याचे प्रमाणपत्र कॅबिनेट मंत्री अतुल सावे, खासदार संदिपन भुमरे यांच्या हस्ते देण्यात आले.

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

सकाळी ११ वाजता दि. २०-२-२०२५ ला छत्रपती संभाजीनगरचे लोकप्रिय खासदार श्री संदिपनजी भुमरे साहेब व महाराष्ट्र राज्याचे कैबिनेट मंत्री विकास पुरुष. ना श्री अतुलजी सावे साहेब यांच्या हस्ते पोलीस मित्र संघ महाराष्ट्र राज्य छत्रपती संभाजीनगर शाखेचे उद्घाटन दोन्ही मान्यवरच्या हस्ते करण्यात आले. पोलीस मित्रा संघाचे अध्यक्ष श्री मोहिते पाटील व कोषाध्यक्ष श्री पवार सर यांनी मान्यवरांचे बुके व शाल देऊन सत्कार करण्यात आला व मोहिते पाटील यांनी भाषण केले व मान्यवरांच्या हस्ते मोहिते पाटील यांना विशेष कार्यकारी अधिकारी याचे प्रमाणपत्र देऊन साहेबानी कौतुक केले. सर्व पोलीस मित्र व सर्व मान्यवर उपस्थित राहिल्याबद्दल सर्वाचे मनःपूर्वक अभिनंदन. मोहिते पाटील यांनी केले व चहा पाण्याचा कार्यक्रम झाला.

## सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी केली दिल्ली येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याच्या कामाची पाहणी

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

शासनातर्फे मुंबईत इंदू मिल येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा ३५० फुट उंचीचा भव्य पुतळा उभारण्यात येत आहे. हा पुतळा बनविण्याचे काम ज्येष्ठ शिल्पकार राम सुतारयांच्या गाझियाबाद येथील कार्यशाळेत होत आहे. राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी आज या कार्यशाळेस भेट देऊन पुतळ्याच्या कामाची पाहणी केली. त्यांच्या समवेत शिल्पकार राम सुतार, त्यांचे पुत्र, सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव हर्षदीप कांबळे, विशेष कार्य अधिकारी अभय देशमुख इ. उपस्थित होते. तसेच सामाजिक न्याय मंत्री शिरसाट यांनी पुतळ्याच्या कामाची गुणवत्ता, प्रगती, इत्यादींचा आढावा घेऊन राम सुतार आणि अधिकाऱ्यांशी चर्चा केली.

## 'इंडियाज गॉट लेटेंट' वादानंतर केंद्र सरकारने ओटीटीसाठी जाहीर केल्या नव्या मार्गदर्शक सूचना

नवी दिल्ली :'इंडियाज गॉट लेटेंट' मुळे सुरू झालेल्या गदारोळाच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने भारतात सक्रीय असलेल्या सर्व ओटीटी प्लॅटफफॉर्मसाठी नव्या मार्गदर्शक सूचना प्रसिद्ध केल्या आहेत. कार्यक्रम प्रसिद्ध करताना तो कोणत्या वयोगटासाठी आहे हे जाहीर करावे; असे केंद्र सरकारने ओटीटी प्लॅटफफॉर्मना बजावले आहे. तसेच माहिती तंत्रज्ञान कायदा २०२१ चे पालन करण्याचे निर्देश केंद्र सरकारने ओटीटी प्लॅटफफॉर्मना दिले आहेत. माहिती तंत्रज्ञान कायदा २०२१ चे उल्लंघन केल्यास संबंधित ओटीटी प्लॅटफफॉर्मवर कारवाई करणार असल्याचा इशारा केंद्र सरकारने दिला आहे.

'इंडियाज गॉट लेटेंट'च्या एका भागात यू ट्रयुबर रणवीर अलाहाबादिया याने केलेल्या वक्तव्यावरुन सुरू झालेला गदारोळ अद्याप शमलेला नाही. पोलिसांनी या प्रकरणात यू ट्रयुबर रणवीर अलाहाबादिया आणि समय रैना या दोघांविरोधात गुन्हा नोंदवला आहे. आई वडिलांविषयी यू ट्रयुबर रणवीर अलाहाबादियाने केलेल्या वक्तव्यावरुन वादाला सुरुवात झाली. सर्वोच्च न्यायालयाने रणवीर अलाहाबादियाला फटकारले आणि पासपोर्ट ठाणे पोलिसांकडे जमा करण्यास सांगितले. मागील काही दिवसांपासून रणवीर अलाहाबादिया गायब आहे. त्याच्या मुंबईतील घराला कुलुप आहे. या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयाने रणवीर अलाहाबादियाला देश सोडण्यास बंदी घातली आहे. याच प्रकरणात राज्याच्या सायबर सेलने ५० सेलिब्रेटींना समन्स बजावले आहे. महाराष्ट्र सायबर सेल सध्या इंडियाज गॉट लेटेंटच्या सर्व भागांची तपासणी करत आहे. यू ट्युबवरील कार्यक्रमासाठी पैसा नेमका कोणत्या मार्गाने येत होता आणि कसा वापरला जात होता, याचाही पोलिस तपास करत आहेत.

## शिवजयंती निमित्त देवगिरी महाविद्यालयात विद्यार्थी आणि कर्मचारी यांनी केले रक्तदान



**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

देवगिरी महाविद्यालयातील एनसीसी, एन एस एस व क्रीडा विभागाच्या वतीने शिवजयंतीचे औचित्य साधून संजीवनी रक्तपेढी छत्रपती संभाजी नगर आणि देवगिरी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने या रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सदरील शिबिरात एकूण ९८ विद्यार्थी आणि कर्मचारी यांनी रक्तदान केले.

या रक्तदान शिबिराचे उद्घाटन मशिप्र मंडळाचे उपाध्यक्ष श्री.सलीम शेख यांच्या हस्ते संपन्न झाले याप्रसंगी मशिप्र मंडळ कार्यकारिणी सदस्य, श्री.त्रिंबकराव पाथरीकर यांची प्रमुख उपस्थिती होती. शिवजयंतीचे औचित्य साधून रक्तदान शिबिराचे आयोजन हा नव उपक्रम देवगिरी देवगिरी महाविद्यालयाने आयोजित केला आहे या माध्यमातून रक्तदान ही चळवळ बनली पाहिजे असे प्रतिपादन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक तेजनकर यांनी केले. याप्रसंगी महाविद्यालयचे उपप्राचार्य डॉ.रवी पाटील, डॉ.अपर्णा तावरे, डॉ.गणेश मोहिते यांची प्रमुख उपस्थिती होती. राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ.अनंत कणगरे, डॉ.भाऊसाहेब शिंदे, डॉ सुवर्णा पाटील राष्ट्रीय छात्र सेनेचे कॅप्टन डॉ.परशुराम बाचेवाड, कॅप्टन डॉ.सुलक्षणा जाधव, क्रीडा विभाग प्रमुख डॉ.शेखर शिरसाठ आणि संजीवनी रक्तपेढीचे संचालक श्री लक्ष्मण नवले यांच्या पुढाकारातून हे रक्तदान शिबिर संपन्न झाले.

# दिल्लीच्या मराठी संमेलनाविरोधात विद्रोहीचा आवाज घुमणार छत्रपती संभाजीनगरात

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

## अध्यक्ष, उद्घाटक व तीन दिवसांची भरगच्च कार्यक्रम पत्रिका जाहीर ! दिल्लीचे मराठी साहित्य संमेलन भाजपचे आश्रित... विद्रोहीचा आरोप

दिल्लीचे मराठी साहित्य संमेलन हे भाजप सरकारचे आश्रित आश्रीत असल्याचा आरोप विद्रोही सांस्कृतिक चळवळीच्या राज्याध्यक्षा प्रा. प्रतिमा परदेशी यांनी मुंबई व छत्रपती संभाजीनगर येथे १८ फेब्रुवारी रोजी झालेल्या पत्रकार परिषदेत व्यक्त केला. त्या अखिल मराठी साहित्य संमेलनाच्या प्रक्रियेबाबत बोलतांना पुढे बोलताना पुढे म्हणाल्या की, आधी राजकीय बनलेल्या अखिल भारतीय संमेलनाचे आता शासकीय आणि पक्षीय संमेलनात रूपांतर झाले आहे तो जनतेच्या हिताचा नाही, असा विद्रोही घणाघाती आरोप या पत्रकार परिषदेत केला.

विद्रोही सांस्कृतिक चळवळीच्या वतीने १९९९ पासून अखिल भारतीय ब्राह्मणी भांडवली पुरुषसत्ताक मराठी साहित्य संमेलनाच्या विरोधात विद्रोही मराठी साहित्य संमेलने आयोजित करण्यात येतात. महात्मा फुले यांच्या साहित्य संस्कृतीविषयक भूमिकेवर आधारित या विद्रोही साहित्य संमेलनाचे आयोजन अखिल भारतीय ब्राह्मणी मराठी साहित्य संमेलनाच्या समोर त्याच दिवशी त्याच तारखांना व अनेकदा समोरासमोर करण्यातआले आहे. नाशिक, उदगीर, वर्धा व अमळनेर या ठिकाणी तर कोट्यावधींचा खर्च करूनही मंडपातील रिकाम्या खुर्च्यांमुळे खजील झालेले अखिल भारतीय ब्राह्मणी मराठी साहित्य संमेलन आता दिल्लीश्वरांच्या आश्रयाला गेले आहे. विद्रोही साहित्य संमेलन मात्र मराठी मातीत पाय रोवून विषमतावादी, शोषक संस्कृतीच्या विरोधात फुले, शाहू, आंबेडकरी भूमिका घेऊन खंबीरपणे लढत आहे; म्हणूनच १९ वे अ.भा. विद्रोही मराठी साहित्य संमेलन छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद ) येथील आमखास मैदानात मलिकअंबर नगरीत २१,२२ व २३ फेब्रुवारी रोजी संपन्न होत आहे. त्या संदर्भाची भूमिका, संमेलनाची कार्यक्रम पत्रिका ,अध्यक्ष व उद्घाटक इत्यादी दि.१८ फेब्रुवारी रोजी जाहीर करण्यात आल्या. सत्यशोधक समाजाचे १५१ वे वर्ष, भारतीय प्रजासत्ताकाचे ७५ वे वर्ष यानिमित्ताने होणाऱ्या एकोणिसाव्या विद्रोही मराठी संमेलनाच्या अध्यक्षपदी मराठीतील लोकसाहित्य ,संस्कृती व प्राच्यविद्या अभ्यासक,इतिहास संशोधक,भाषा तज्ञ,विचारवंत डॉ. अशोक राणा यांची निवड तर उद्घाटक म्हणून ख्यातनाम आंबेडकरवादी हिंदी साहित्यिक, समीक्षक, अनुवादक, विचारवंत कंवल भारती (दिल्ली) यांची निवड करण्यात आली असून छत्रपती संभाजीनगरात होणाऱ्या १९ व्या विद्रोही मराठी साहित्य संमेलनात तीन दिवस भरगच्च कार्यक्रम होणार असल्याचे या पत्रकार परिषदेत प्रा.प्रतिमा परदेशी व १९ व्या विद्रोही मराठी साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष इंजि. सतीश चकोर व मुख्य निमंत्रक एडवोकेट धनंजय बोरडे यांनी घोषित केली.

छत्रपती संभाजी नगर (औरंगाबाद)येथील आमखास मैदानावर उभारलेल्या मलिकअंबर साहित्यनगरीत २ भव्य सभामंडप असून ३ दालनांमध्ये बालमंच, युवा मंच यासह एकूण ४ विचार मंचावर विद्रोहीचे विविध कार्यक्रम होणार आहेत. 'शिवाजी अंडरग्राउंड इन भीमनगर मोहल्ला' व 'बिस्मिल्ला' या दोन नाटकांसह पुढील दोन दिवसांमध्ये विद्रोहीत ६ परिसंवाद , १४ गटचर्चा,१ विशेष व्याख्यान होईल. काव्य पहाट मैफिल, गझल संमेलन, अशी ४ कविसंमेलने व काही सत्रात साहित्यिक, विचारवंत, पत्रकारांशी साहित्य संवाद होईल. सांस्कृतिक व कला प्रकारात आदिवासी गाणी, कला दर्शन, लोककलांचे सादरीकरण व महाराष्ट्र दर्शन इत्यादी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे सादरीकरण होणार आहे.




कथाकथनांच्या कार्यक्रमासह २ नाट्यवाचन , ३ एकपात्री प्रयोगासह २ एकांकिकेचे सादरीकरण या मंचावर होणार आहे. युवा कलाकारांचे रॅप गीतांचे सादरीकरण लक्षवेधी ठरणार आहे.

खास मंडपातील ८ कला दालनात चित्रकाव्य, शिल्पकला, सुलेखन, चित्रकला, कलात्मक फलकलेखन, रांगोळी, व्यंगचित्र अशा ८ कला प्रकारांचे लाईव्ह सादरीकरण व प्रदर्शन होईल. 'संविधान आणि स्वातंत्र्य आंदोलनातील मुसलमान ' या विषयावरील २ पोस्टर प्रदर्शन भरवण्यात येणार आहे.

महाराष्ट्रातील कथा, कविता, नाटक, ललित इत्यादी साहित्य प्रकारातील २०० हून अधिक निमंत्रित साहित्यिक उपस्थित राहणार असून २१ जिल्ह्यातील ७५ लोकशाहीवादी विचारवंत , अभ्यासक, तसेच १० कथाकथनकार आणि ४ इतिहासकार, १५ गजलकार, यांच्यासह ३५ नाट्य व सिनेमालिका अभिनेते , एकपात्री नाटककार, एकांकिका नाट्यछटाकार, १२३ निमंत्रित कवी, अशा विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती साहित्यप्रेमींसाठी वैचारिक मेजवानी ठरणार आहेत. महाराष्ट्रातील वारकरी, महानुभाव, लिंगायत, बौद्ध, आदिधर्म इत्यादी पाच धर्मपीठांचे प्रमुख प्रतिनिधी, तसेच २७० लोककलाकारांसह १५ गायक, शाहीर ,भीमगीतकार , रॅप कलाप्रकारातील ७ युवा कलाकार, बोलीभाषांचे २० अभ्यासक, ७ नामवंत पत्रकार आणि विद्रोहाच्या लेखणीची तोफ तयार करणारे चित्रकार राजानंद सुरडकर व शिल्पकार विकास सरवदे या कलाकारासह ७ शिल्पकार, १ व्यंगचित्रकार, यांसह २ चित्रकाव्यकर्ते , ५ चित्रकार, ४ पोस्टर प्रदर्शनकार,२ सुलेखनकार, २ फलकलेखनकार आपले योगदान देवून विद्रोही साहित्य चळवळीचा जागर यशस्वी करणार आहे.

या संमेलनात माजी संमेलनाध्यक्ष डॉ. प्रतिभा अहिरे, डॉ.प्रल्हाद लुलेकर, डॉ.वासुदेव मुलाटे, गणेश विसपुते हे मार्गदर्शन करणार आहेत. तसेच १) भारतीय जाती व पुरुषप्रधान विषमतेला धर्म आणि संस्कृतीच्या आधारे दूर करता येणे शक्य आहे,२) बोलीभाषा, प्रमाणभाषा, अभिजात भाषा आणि सांस्कृतिक वर्चस्वाचे राजकारण, ३) सोशल मीडिया अन्यायाविरुद्ध लढण्याचे साधन? ४)अंधकारमय काळात नवे विषय- नवी आव्हाने - नवे लेखन साहित्यिकांशी संवाद. ५) इतिहासाचे विकृतीकरणाविरुद्ध सत्य इतिहासकथन या पाच विषयांवरील परिसंवाद होणार आहेत. अरविंद सुरवाडे ,प्रा.मोहन बाबुळगावकर,प्रभू राजगडकर धर्मकीर्ती महाराज परभणीकर,कोर्णेश्वर आप्पाजी, डॉ वंदना महाजन, डॉ देवेंद्र इंगळे,डॉ. दिलीप चव्हाण, डॉ,लीलाधर पाटील, डॉ.पी.टी. गायकवाड, डॉ.अशोक नारनवरे, डॉ. शिवाजी हुसे, संध्या नरे-पवार, ॲड.वैशाली डोळस, प्राचार्य डॉ.संजय मून, प्रा.कोंडबा हटकर, सुनीता भोसले, शाहू पाटोळे, छाया बेले, डॉ. मारोती कसाब, आशा डांगे, डॉ.नवनाथ गोरे हे मान्यवर सहभागी होणार आहेत.

१९ व्या विद्रोही मराठी साहित्य संमेलनात मराठी साहित्यिक, नाट्यकलावंत, लोककलावंत, कवी ,नाटककार, ललित लेखक , १०,००० दहा हजाराहून अधिक रसिक फुले, शाहू, आंबेडकरी , अंधश्रद्धा निर्मूलन, शेतकरी, कामगार व विद्यार्थी चळवळीतील कार्यकर्ते तसेच आदिवासी क्षेत्रात काम करणारे संविधानिक मूल्यांसाठी लढणारे कार्यकर्ते सहभागी होणार असल्याचे विद्रोही सांस्कृतिक चळवळीच्या राज्याध्यक्षा प्रा.प्रतिमा परदेशी, स्वागताध्यक्ष इंजि. सतीश चकोर व मुख्यनिमंत्रक ॲड.धनंजय बोर्डे यांनी जाहीर केले. यावेळी विद्रोही मराठी साहित्य संमेलनाचे राज्यसंघटक किशोर ढमाले, कार्याध्यक्ष खलील अहमद, खजीनदार ॲड.के.ई.हरिदास, अनिलकुमार बस्ते,भाऊसाहेब जाधव, समन्वयक प्रा.भारत सिरसाठ, ॲड.वैशाली डोळस, अनंत भवरे, डॉ.धोंडोपंत मानवतकर, वजीर शेख, जितेंद्र भवरे, मधुकर खिल्लारे, सविताताई अभ्यंकर, डॉ विनय हतोले,रामदास अभ्यंकर, भीमराव गाडेकर, वैभव सोनवणे, सुधाकर निसर्ग, कबीर बोर्डे, रतनकुमार साळवे, अमरदीप वानखडे उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मालक, मुद्रक , प्रकाशक - श्री. **रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५ ए , सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर , सिडको, औरंगाबाद (महा.) - ४३१००५ येथे छापून शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७, सिडको पोलीस स्टेशन जवळ, औरंगाबाद (महा.)- ४३१००३ येथे प्रसिध्द केले.

• संपादक : रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल • मो. 7588166496 • Email : attalsanket2023@gmail.com • RNI No. MAHMAR/2023/87816

This Daily Printed, Published and Owned by **RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** Printed at Mansi Printers, Plot No. 45 A, Service Industry Sector, Aurangabad (M.S.)- 431005 and Published at Shop No. 3, Keshardeep Complex, N-7, Near Cidco Police Station, Aurangabad (M.S.)- 431003

• Editor : RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL • मो. 7588166496 • Email : attalsanket2023@gmail.com • RNI No. MAHMAR/2023/87816